
# पर्यटन

जुलै १९७७

मूल्य दोन रुपये



किल्ले रायगड

मनोऱ्यांच्या कमानीतून

अलिकडे गंगासागर तलाव

मागे विश्रामधाम व

मागील डोंगररांगेत

डावीकडे काळा कुळकुळीत

कोकणदिवा.

—पानशेत ते रायगड.

- फिनिक्स-सोमनाथ मंदिर
- किल्ले रांगणा
- मुक्काम सागर
- अमेरिका पहावी फिरून

# किल्ले माणिकगडावरील रात्र !

तु. वि. जाधव

आम्ही सगळे मिळून नउजण. त्यातले सातजण पार्ल्याच्या हॉलिडे हायकर्स क्लबचे सभासद. श्रीकांत फणसळकर गुबगुबीत बालसेदार ! सुरेश कुलकर्णी दणकट प्रकृतीचा ! सूत्रधारही तोच ! बाकीचे उमद्या दिलाचे. तरूण रक्ताचे. अनेक डोंगर ओलांडून गेलेले. बेलाग कडे चढून आलेले. कित्येक अडचणी पार केलेले मी आठवा. तसा किरकोळ पण काटक. नि नववे गिरगावातले श्रोत्री, बहुत बहुत हिंडलेले दोनवेळा भारत भ्रमण केलेले. हिमालय भटकून आलेले. गंगोत्री पर्यंत चढून गेलेले. आमच्यात वयोवृद्ध वयवर्ष सत्तर ? असे हे आम्ही नवजण! भिन्न व्यवसायातले. पण एकच आस ऊरीपोटी बांधलेले ! पाताळगंगे किनारी असलेल्या एका वटवृक्षाखाली विसावलो आहोत. समोर दूरवर दिसणाऱ्या धुराच्या धुरकटी आवरणातून काहिसा अस्पष्ट डोकावणारा माणिकगड आम्हास खुणावतो आहे. तिथं किती वाजता पोहचु याचा अंदाज बांधीत आहोत,वाटाड्या मिळेल कि नाही या विवंचनेत आहोत.

नदीत मनमुराद डुंबून येतो. घास घास खावून घेतो नि माणिकगडाचे दिशेनें कूच करतो.

रणरणीत उन्हाची टळटळीत दुपार ... दुपार वयात आली आहे. ती पराकाष्टाची तापू लागली आहे.अंगाला चटचटू लागली आहे. सर्वांगाची लाहीलाही होते आहे. मधूनच एखादी वाऱ्याची झुळूक आपला सहानभूतीचा हात सर्वांगि फिरवते. तेवढ्यापुरतच बर वाटत.

दुतर्फा वासोट्या नि फड्या निवडुंगाच्या काटेरी शतकुंपणातून धूळ खात पळत सुटलेली वाट ... वाटेवरची धूळ उन्हाच्या धगीनं मनस्वी तापली आहे... पाऊल टेकताक्षणीच घोट्यापर्यंत बूडतं आहे ...आगीत पहाव तस भाजून निघतं आहे. बाजुच्या शेतवाडीतून मशागत चालू आहे ... मुळापासून जमिनीचा कस काढला जातो आहे ... पोटाचं निपाट पाठीला टेकलं आहे ... हे एक यज्ञकर्म आहे. ते प्रत्येकास करावं लागणार आहे. त्या भूमिपुत्राच हे सुरवातीचं भूमिपूजन आहे ... घामाच्या अभिषेकाने अन्नदात्री प्रसन्न होईल उसळत्या ढेकळातून कोवळा लुसलुशीत कोंब अंकुरला जाईल ... स्वेदगंगेची अन्नगंगा होईल ...

गप्पांच्या पुरात वाहता वाहता 'चावणं' मागं पडतं नि नदी नाले ओलांडून 'सावण्यास येऊन थडकतो. गाव केवढं ? तर, तळहाती घेऊन सहज निरखता येईल एवढं. पंधरावीस उंबऱ्याचं. एवढ्या आडरानात एकटचं वसलेलं. अशा या लहानुकल्या गावात अतीथ्यशील असलेल्या राजाराम देशमुखांच्या घरी मोठ्या अगत्यानं नि आदरानं आमचा पाहुणचार घेतला जातो.

ठाकरवाडी पासून एकदोन फर्लांगावर लागते चढण. वाट जाते वळणावळणानं. रानातून दो बाजूस गच्च रान दुतर्फा नाना जातीची रानवेलींनी कवटाळलेली झाडं आपल्या फांदोऱ्याचे हात पसरून वाटेवर सावली धरून उभी असलेली. काहिंनी तर आपल्या शरीरावरचा भार झटकून हलका केला. वाटेवर एक एक वीत जाडीचा पाचोळ्याचा थर साठवलेला त्यातून ही ढोरवाट. मुख्य वाटेला लक्षलक्ष वाटा फुटलेल्या. त्या कुठंतरी जाऊन आडरानात घुसलेल्या,...न्हांटाच्या रूरवाळीत हरवून गेलेल्या ... खरी वाट कुठली हे उमजेनासं होतं पण, 'जान्ता बाप्या' 'रामू ठाकर' 'म्होर आहे त्या म्होरक्याचं मार्गदर्शन अचूक आहे. आम्हाला यत्कींचीतही चिंता करण्याचं कारण नाही.

चढतो आहोत चढताना धांप लागते आहे. ती लागणारच. जीव कंठाशी घुटमळतो आहे ... पाणपिशव्यातलं पाणी संपलं आहे. पाठीवरच्या 'हॅवरसॅक्स' अवजड झाल्या आहेत. त्या फेकून द्याव्याश्या वाटतात. शिरी शितल छायेचं छत्र असून देखील नखशिखांत न्हाऊन निघालो आहोत.

पाचोळा तुडवीत ही दुर्घट चढण कशीबशी चढतो

नि समोरचं टेप चढून वर येतो. तोच पुढं उभा ठाकतो गडाचा पश्चिम कडा. नखशिखांत नागवा. काळाकभिन्न अदमासे पाचशे फूट उंचीचा भीमकाय शरीराचा. छातीचा कोट करून सरळसाट उभा असलेला. वरपासून खालपावेतो तुटलेला.

' समोरची सपाटी ओलांडली की लागते खरी अवघड चढण. वाट पूर्वीसारखीच पण अवखळ दगडधोंडींनी खडबडलेली एका आडरानात घुसलेली. गुराढोरांच्या पदाघातानं फुटलेली. पावसाळ्यातल्या पाणलोटानं खोलगट झालेली. दुतर्फा करवंदीच्या जाळ्यांच जंजाळ आपले काटेरी बाहू पसरून वाट अडवून उभं असलेलं. भले थोरले दगड ऐन वाटेवरच ऐसपैस ठाण मांडून बसलेले. मुळातच वाटेवरच्या धोंडी नीट बसलेल्या नाहीत. पाय टेकताक्षणीच डुगडुगु हलताहेत. हरघडी तोल जातो आहे. आधार म्हणून एखादी रानवेल धरून जावं तर ती दुर्दैवाने सुकलेली असते. कटदिशी मोडून पडते. पावलागणिक पाठीवरच ओझं संभाळावं, अंग पेलून तोल सावरावा, ओरखडणाऱ्या काट्याकडं दूर्लक्ष करावं, मध्येच चेहऱ्यावरला डवरलेला घाम हातानं पुसावा नि त्याच हातानं वाटेवरचं हे काटेरी जंजाळ बाजूला सारीत असल्या या अडगळ वाटेनं, मोठ्या प्रयासानं काठीचा आधार घेत वर चढावं. चढताना एखादा जरी धोंडा बसणीतून निसटला तर जबड्याचं चक्कं बीळकं व्हायचं नि मग घरी गेल्यावर फारच मोठी 'पंचाईत व्हायची ते तसलं चोरपावलांनी येणारं अकाली वार्धक्यं टाळण्यासाठी की काय कोण जाणे अनिल पटवर्धन मला सारखा सारखा म्हणतो आहे.

" तुक्या जपून, तू जपून टाक पाऊल जरा, जीवना-तल्या मुशाफिरा " मी लागलीच उत्तरतो आहे " वाचे विठ्ठल वदावे पुढे पाऊल टाकावे । "

अर्धाधीक चढ चढतो नि मग एकदमच कड्याच्या पोटाखालून चालू लागतो, पुढं एका पाणथाळ नाळीतून साठलेले दगडधोंडे ओलांडून वर येतो नि समोरच एक निसरत टेपाड चढून ऐन माथ्यावर येऊन पोहोचतो. पाठीवरच्या पाठपिशव्या एका चौथऱ्यावर फेकून देतो. पिसं भरल्यागत धावत सुटतो. मावळतीकडच्या एका बरूजावर जाऊन उभा राहतो. नि समोरचं डोळे खिळ-वून ठेवणारे दृश्य पाहून काहीक्षण भारावून जातो ...

हरवून जातो ... हरवून जातो ... समोर दूरवर डोंगराच्या एका शिखरावर अलगद टेकलेलं सूर्यबिंब. संपूर्ण पश्चिम दिशेवर पसरलेलं संधिप्रकाशाची झिर-झिरीत आवरण ... त्या काहीशा मुलायम रेशमी अव-गुंठनाखालून झिरपणारी केशरमिश्रीत सोनेरी किरणं... नि या बेहोषीत दुर्ग कर्नाळ्यावरील शिवलिंगासारख्या दिसणाऱ्या या वेलाग सुळक्यांचं नयनरम्य दर्शन ... हे दृश्य नेहमीचंच. सर्वांच्याच परिचयाचं पण एवढ्या ह्या दोन हजार फूट उंचावरून काहीसं अधिकच लोभ-सवाणं दिसणारं ... हे सौंदर्याचं साम्राज्य ... श्वास रोखून पहात रहावं नि निसर्गानं मुक्त हस्तानं उधळलेले हे रंगवैभव डोळियांनी टिपून घ्यावं ... ही नीरव शांतता ... हा निखळ एकांत ... ही श्यामल संध्या-वेला ... ही वेळच मोठी विचित्र ... एक अनामिक हुरहुर लावणारी ... प्रतिक्षेच्या अपेक्षेने व्याकुळ कर-णारी...काळजाला बेचैन करणारी...उरीच्या जखमेलो हलकेच झोंबणारी ...

ढासळलेले बुरूज, अगदी जुजबी तटबंदी, बांधकामा करिता चुना मळण्याची घाणी, चोरवाट, मुख्य दरवाजा त्याकडे जाणाऱ्या पायऱ्या बहुतांशी ढासळलेल्या, उघ-ड्यावर पडलेली दोन शिवलिंगे, तडा गेलेला नंदी, मंदिराचा ऊखळलेला घरटा, जागोजागी शिबंदीच्या घरट्यांचे चौथरे, पाण्याची टाकी, एक भला मोठा हौद, मधोमध खासा किल्लेदाराचा वाडा, नि त्यास खेटूनच असलेली छोटेखानी सदर. या सर्व वास्तूंवर सर्वभक्षक काळानं आपला सर्वनाशी हात अगदी निर्घृण पणे फिरवलेला.

वाड्याशेजारीच आमचा तळ पडला आहे, सायकल च्या टायर्सचे तुकडे जागोजागी मशालीगत पेटलेले आहेत. त्या अपुऱ्या उजेडात भात पिठल्याची मेजवानी झडते. शतपावली होते. शिळोप्याच्या गप्पासप्पा होतात नि सारेजण उघड्या आकाशाखाली झोपी जातात.

अचानक जाग येते. मध्यरात्र उलटून गेली असावी. भराट वारा सुटला आहे. सारे सखेसोबती डाराडूर झोपले आहेत. दोघेजण तालासुरात घोरताहेत. एकाने तर चक्क खर्जंच लावला आहे. बहुधा श्रोत्री असावेत. काहिंना तर पिठलंभात मानवलेलं दिसत नाही.

वर अधांतरी पसरलेलं आकाश एखाद्या प्रचंड घुम-

टासारखं दिसत आहे ते लखलख चांदण्यानं भरलं आहे. दुपारी रखरखीत उन्हात घामानं चिंब भिजून गेलो होतो. आता मात्र शीतल चांदण्यात सचैल न्हाऊन निघतो आहे वर दुधीच्या रंगाची आकाशगंगा पूर्व-पश्चिम वाहते आहे. जणू मोतीयांचा चुरा वाहून नेते आहे. घुमटभर अनेक ओळखीचे तारे अधूनमधून लुकलुकताना दिसताहेत....त्यात पुनर्वसू आहे. मृगाधिप्याध आहे. अत्यंत तेजस्वी असा शुक्र आहे.पतंगाकृति सप्तर्षि आहे नि बाजूलाच अढळपदी विराजमान झालेला ध्रुव आहे तो बालयोगी अचल आहे. स्थित: प्रज्ञासारखा निश्चल आहे. माऊलीने ज्ञानेश्वरीत एक सुन्दर दृष्टांत दिला आहे 'जातया अभ्रासवे जैसे आकाश न धावे भ्रमण चक्री न भंवे । ध्रुव जैसा ॥

आज शुद्ध चतुर्दशी आहे. आज शुक्रशनिची युती पूनर्वसूजवळ होणार आहे. त्यांच्यातले अंतर हळहळ उणावेल. दोघेजण परस्पर सामोरे येतील. रामराम होईल. दोघांची गळामिठी होईल. क्षेमकुशल विचारलं जाईल लगेच गतिमान शुक्र आपला निरोप घेऊन आपला पूढचा मार्ग आक्रमू लागेल.

एका बुरूजावर उभा आहे. चांदण शिंपलेली रात्र... किंचीत भयाण ... काहिशी गंभीर... चहुबाजूंचे डोंगर ब्रम्हानंदी टाळी वाजल्यागत ध्यानस्थ बसले आहेत. समोर लखलख प्रकाशात न्हालेलं दुर्ग कर्नाळ्यावरील संन्यस्त दुर्ग पाहून क्षणभर हरवल्यासारखं होतं... दूरवर रासायनितील विजेच्या दिव्यांची टिब तारकांशी स्पर्धा करताहेत. गच्च रानातील दच्च काळोखात काजव्यांची रोषणाही उठून दिसते आहे ... रातकिडयांचा किर्र किडन असा मर्मर ध्वनी...घुबडांचं घुत्कारण. रानमांजराचं विविध आवाजात रडणं ..ठाकरवाडीतल्या कुत्र्यांचं कर्कश भुंकणं ... वानरांचा किचकिचाट ... रानडुकरावर झाडलेल्या फैरींचे आवाज...सावण्याच्या हनुमान मंदिरातून गंदधुंद समीरासवे येणारी टाळमृदंगाची धून ... नि या अशा भय मिश्रीत आनंदाच्या बेहोशीत अधून मधून होणारा उल्कापात !

वीतभर पोटाची टीचभर खळगी भरण्यासाठी धाव. पळीचं हे मानवी जीवन ... या असल्या धकाधकीच्या जीवनात कधीकाळी हे असले आनंदाचे क्षण येतात नि सारं जीवनच कसं मंत्रागत भारून जातात या असल्या क्षणाची चव चाखण्यात जी एक अवीट गोडी असते ती सांगून कळायची नाही ती प्रत्यक्ष अनुभवावी लागेल.

हा गड तसा काहि नामांकित लढाव नसावा. हे पहाऱ्याचं एक बुलंद ठिकाण. इथून अगदी दूरवर नजर ठेवता येते. तर मग कोणे काळी गनिमाची चाहूल सर्वप्रथम याच बुरूजावरील पहारेकऱ्याला लागली असेल. डोळ्यात तेल घालून नंग्या तलवारीनिशी खडा पहारा करणारे नि हाती चूड घेऊन गस्त घालणारे मऱ्हाठे...! या इथच, या मातीवर याच आकाशाखाली हाच भराट वाटा पिऊन त्याची छाती कशी अभिमानानं फुगली असेल. याच भराव वाऱ्यानं मला पुरतं झपाटलं आहे. वर्तमानापासून फार दूर मन फेकलं आहे...... भूतकाळाच्या गहिऱ्या गंभीर गर्तेत लोटलं आहे ... माझी मलाच विस्मृती झाली आहे... की कुणास ठाऊक पण अचानक ऊर भरून येतो हुंदका गळ्याशी दाटतो. यवनांच्या अमानूष जुलमी राजवटीखाली चिरडलेल्या पाशवी अत्याचाराच्या टाचेखाली तुडवलेल्या, उन्मत राजसत्तच्या जबरदस्तीमुळं वाढलेल्या नि निर्दय आक्रमणाखाली भरडून निघालेल्या या अफाट 'मऱ्हाठा' देशास ज्यांनी पारतंत्र्याच्या जखडलेल्या लोहशृंखलातून मुक्त केलं त्या महान कार्यात असल्या मराठी रांगड्या गड्यांचा सिंहाचा वाटा होता. त्या अज्ञात शक्तिपुत्रांना हा माझा पहिला वहिला मानाचा मुजरा ...!

□ □ □


तुमच्या स्वागतासाठी, सोयीसाठी, सेवेसाठी

## हॉटेल विश्वकमल

### ४७५ स्वारगेट जकात नाक्या-समोर, सातारा रोड, पुणे ९

□ शांत रम्य परिसर □ अद्ययावत व्यवस्था □ बस, एस्. टी. व सिनेमा थिएटर जवळच □ अत्यंत माफक दर.

फोन : ४१३२८ • ४३२८८